M 72 आपटे ...

## विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील ३२ तुकड्यांना मान्यता

### प्राचार्य संघटनेचे पत्रक

कोल्हापूर, ता. १२ : शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील महाविद्यालयांच्या ३२ तुकड्यांना शासनाची मान्यता मिळाल्याची माहिती शिवाजी विद्यापीठ प्राचार्य संघटनेचे सचिव प्राचार्य क्रांतिकुमार पाटील यांनी पत्रकाद्वारे दिली आहे.

पत्रकात म्हटले आहे, की शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात शंभर तुकड्यांना मान्यता मिळाली नव्हती. संघटनेने शिक्षणमंत्र्यांशी याबाबत चर्चा केली होती. उरलेल्या तुकड्यांना मान्यता मिळविण्यासाठी संघटना प्रयत्नशील आहे.

● भोपाळ, ता. १२ : राज्यातील विधानसभेच्या पोटनिवडणुकीत १० जागांसाठी ६०.२६ टक्के मतदान झाले.

## विद्यापीठ कार्यक्षेत्रात नवीन ३२ तुकड्यांना मान्यता

कोल्हापूर, दि. १२ : शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रात महाविद्यालयांना नव्या ३२ तुकड्यांना शासनाने मान्यता दिली असल्याची माहिती शिवाजी विद्यापीठ प्राचार्य असोसिएशनचे सचिव डॉ. क्रांतिकुमार पाटील यांनी एका पत्रकात दिली आहे.